IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# संस्कृत आणि भारतीय ज्ञान परंपरा

**प्रा. दीक्षा विजय मोरे**
सहाय्यक प्राध्यापिका, संस्कृत विभाग
किसन वीर महाविद्यालय ,वाई
dikro1316@gmail.com

**सारांश (Abstract):** *आज देखील आपण पाहतोच की, संस्कृत भाषा ही केवळ एक प्राचीन भाषा आणि देवांची भाषा म्हणूनच मानली जाते, परंतु यावर मात करून संस्कृत भाषा ही अग्रगण्य ठरताना दिसत आहे. याचे कारण म्हणजे "भारतीय ज्ञान परंपरा " होय. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (2020) भारतीय ज्ञान परंपरेचा आधुनिकरित्या समावेश आपल्या अभ्यासक्रमात केला आहे आणि हीच ज्ञान परंपरा उमजण्यासाठी आपणाला संस्कृत भाषेला आपलेसे करणे जाणून घेणे अनिवार्यच ठरते. संस्कृत भाषा आणि भारतीय ज्ञान परंपरा यांचा घनिष्ट संबंध आहे आणि भारतीय ज्ञान परंपरेची जणू काय नाळ ,संस्कृत भाषा कशी ठरते याचे सखोल विवेचन या शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वेदांच्या पवित्र मंत्रांमधून मिळणारे अमृत, उपनिषदांतील गूढ अध्यात्म, रामायण-महाभारत इत्यादीसारख्या आर्ष काव्यांमधून उमगलेली मूल्यव्यवस्था, वैद्यकशास्त्र ,धर्मशास्त्र, छंदशास्त्र, आयुर्वेद, ज्योतिष,गणित ,व्याकरण ,नाट्यशास्त्र यांसारख्या संस्कृत साहित्याव्दारे भारतीय ज्ञान परंपरा कशी जोडली गेली आहे आणि या ज्ञान परंपरेचे मूळस्थान हे संस्कृत भाषाच आहे . याचे संशोधनात्मक विवेचन करून प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे .*
*या शोधनिबंधात संस्कृत साहित्याची जी भूमिका आहे. तिचे चिकित्सक विश्लेषण करुन भारतीय ज्ञान प्रणालीचे जतन,आणि प्रसारण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

**मुख्य शब्द:** ज्ञान परंपरा, वेद ,उपनिषदे,तत्वज्ञान,आयुर्वेद,अर्थशास्त्र,नाट्यशास्त्र ,शास्त्रे.

## I. प्रस्तावना

भारतीय ज्ञान परंपरा ही पूर्णपणे संस्कृत विषयावर आधारलेली दिसून येते. भारतीय ज्ञानपरंपरा ही पूर्णतः वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध विचारांवर आधारलेली आपणास दिसून येते. भारतामध्ये प्राचीन काळापासून विकसित होत असलेली विविध तत्त्वज्ञाने नीतीशास्त्र, शिक्षण व्यवस्था यांची एक तार्किक आणि सुसंगत अशी समृद्ध परंपरा होय. तसे पाहिले तर भारत देश घडण्यामागे निश्चितच संस्कृती आणि संस्कृत यांचे महत्व अनन्यसाधारणच आहे. भारतीय ज्ञानपरंपरा, ही एक आगळी वेगळी पर्वणीच आहे .भारतीय ज्ञानपरंपरा हजारो वर्ष जुनी आहे. या ज्ञानपरंपरेत आधुनिक विज्ञान तसेच योग ,आयुर्वेदाबरोबरच व्यवस्थापनेसह सर्वच क्षेत्रांसाठी उपयोगी असा प्रचंड मोठा खजिना दडलेला आहे, आणि या खजिन्याची भाषा संस्कृत आहे आणि या भाषेने नीतीशास्त्र,सौदर्यशास्त्र ,विज्ञान ,तत्वज्ञान यांची एकंदरीत सेवाच केली आहे . असे दिसून येते जगाला भारताने मौल्यवान अशी संस्कृती दिली . 5000 वर्षांपूर्वी जेव्हा अनेक संस्कृती या भटक्या स्वरुपाचे जीवन जगत होत्या. या भटक्या स्वरुपाला आकार देण्याचे काम या संस्कृत भाषेने केले की जी जगाला दैवी स्वरुपात मिळाली आणि ती सर्वात शुद्ध आणि योग्य भाषा संस्कृत होय. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत याच ज्ञान परंपरेने आपण जगाला समृद्ध करित आलेलो आहोत आणि म्हणूनच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये देखील भारतीय ज्ञान परंपरेला सर्वश्रेष्ठ स्थान मिळालेले दिसून येते .

## II. भारतीय ज्ञान परंपरेचा मूळ पाया संस्कृत भाषा :

भारतीय समाजाच्या प्रत्येक मूल्यव्यवस्थेत प्रत्येक श्वासात संस्कृतचे अस्तित्व आजही आपल्याला पहावयास मिळते .भारतीय ज्ञानपरंपरेचे वैशिष्ट्यच मूळात अध्यात्मिक आणि तार्कीकतेचा संगम आहे की ज्या संगमाद्वारे आपणाला भौतिक लाभच नव्हे तर सत्यप्राप्तीच्या आणि मोक्षप्राप्तीच्या दरवाजांची जणू काही कवाडेच उघडलेली मिळतात. संस्कृत भाषेमध्ये असे काही साहित्य आहे

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

की त्या साहित्याने भारतीय ज्ञानपरंपरा भक्कमपणे उभी आहे तर आपण या पवित्र भाषेच्या मूळ साहित्यापासूनच सुरुवात करूयात.

संस्कृत भाषेची मूल्यपरंपरा आणि तत्वज्ञानाशी जोड :-

**वेद :-** संस्कृतमध्ये प्रामुख्याने वेदांचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.ऋग्वेद ,यजुर्वेद,सामवेद ,अथर्ववेद या संस्कृतमधील वेदांना वाङ्मयाचे रत्न म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या वेदांची भाषा पाहिली तर संस्कृतच या वेदांमधील ऋचा या केवळ धार्मिक विधी-परंपरांची सांगडच नव्हेत तर प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेची सुरुवातच मानली पाहिजे वेदांमधील "ऋत" ही संकल्पना मानवाच्या कर्तव्य-निष्ठतेशी जोडली गेली आहे.

**उपनिषद :-** उपनिषद म्हणजे गुरुच्या सन्निध बसून मिळविलेले ज्ञान होय. आणि हे ज्ञान गूढ वलयरुपी आहे . या उपनिषदांनी भारतीय ज्ञान परंपरेमध्ये आपले अस्तित्व टिकविलेले दिसून येते.

**अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।**
**उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥**
(महाउपनिषद, अधाय ४ श्लोक 71)

संस्कृत भाषेमध्ये असलेल्या उपनिषदांनी भारतालाच नव्हे तर जगाला देखील "वसुधैव कुटुम्बकम्' चा संदेश दिलेला आहे आणि या भारतीय तत्वज्ञानानेच जगाला एक पृथ्वी,एक कुटुंब आणि सुयोग्य असा भविष्याचा मार्ग दाखविला.उपनिषदात उल्लेख केलेले एकतत्वाचे सुप्रसिद्ध असे वचन म्हणजे "तत्वमसि" (छान्दोग उपनिषद ६.८ .७ ) "(तू तो ब्रह्म तत्व आहेस )" हे वचन आपल्याला मनुष्याच्या वैश्वीक तत्वाला संबोधित करणारे साम्य दर्शविते आणि म्हणूनच यामध्ये भारतीयांच्या ज्ञान मिळविण्याच्या मार्गाचे प्रतीकात्मक रूपच होय.

**पुराणे :** भारतीय संस्कृतीमध्ये पुराणांना महत्व आहेच , पुराणे ही केवळ मनोरंजनात्मक कथेचा भाग नसून एकंदरीत मानवाच्या वर्तनावर संस्कार करणारी, समाजाला एक प्रकारे नैतिकमार्गावर चालण्यासाठी प्रेरित करतात पुराणे मुळातच मानवी जीवनाला दिशा देण्याचे कार्य करितात त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरेमध्ये पुराणांचे महत्व देखील तितकेच श्रेष्ठ ठरते.

**महाकाव्ये:** आजच्या आधुनिक युगामध्ये कर्माचा सिद्धांत अतिशय प्रचलित होताना दिसतो आहे. कारण हा कर्माचा सिद्धांतच मुळात संस्कृत भाषेमध्ये असणाऱ्या श्रीमद्भगवद्गीतेने जगाला सांगितलेला आहे . भगवद्गीतेतील कर्माचा सिद्धान्त सांगणारा प्रसिद्ध श्लोक :

**कर्मण्येवाधिकारस्तु मा फलेषु कदाचन ।**
(श्रीमदभगवदगीता अध्याय-2, श्लोक-47)

"कर्म कर फळाची अपेक्षा करु नकोस " हा सिध्दान्तच भारतीय ज्ञानपरंपरेचा मुख्य आधारस्तंभ आहे .जगाला एक प्रकारे विश्वशांतीचा संदेश देखील श्रीमदभगवद्गीतेतील काही महत्वपूर्ण श्लोक देतात. त्याचबरोबर रामायण आणि महाभारत या आर्षकाव्यांकडे केवळ मनोरंजक कथा म्हणून न पाहता ही महाकाव्ये भारतीय ज्ञानाचा ओतप्रोत भरलेला महासागरच होय .हि महाकाव्ये आपल्याला सैन्यशास्त्र, नीतीशास्त्र ,अर्थशास्त्र, सामाजिकशास्त्र इत्यादी शाखांचा दाखला देतात त्यामुळे त्यांचा अंतर्भाव भारतीय ज्ञान प्रणालीत करण्यात आलेला आहे.

**दर्शने : -** भारतीय संस्कृतीचा मजबूत पाया म्हणून देखील या दर्शनांकडे पाहिले जाते कारण जीवनाचे अंतिम ध्येय दाखविण्याचे कार्य दर्शने करताना दिसतात .९ दर्शनांपैकी 6 दर्शने संस्कृतीसाठीचा संघर्ष आणि बौद्धिकतेशी असणारी निष्ठा प्रखरपणे दाखवितात तात्विक पायाभूत रचनेसाठी भारतीय ज्ञानपरंपरेत दर्शनांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरते. न्याय आणि वैशेषिक दर्शने ही तर्कांवर भर देतात आणि योग दर्शन मन आणि शरीरावर नियंत्रण ठेवण्या विषयीचे मार्गदर्शन करते. आजच्या या धकाधकीच्या जीवनामध्ये योग दर्शनाचा लाभ देखील बऱ्याच जणांना होत आहे. मानवाचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर दर्शने ही योग्य मार्गदर्शक ठरतात.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

**वैज्ञानिक आणि आजच्या तांत्रिक ज्ञानाची संस्कृत भाषा :-**

**१)नाटयशास्त्र** :- संस्कृत साहित्यातील संपूर्ण नाट्यसृष्टी ही भरतमुनींच्या नाटयशास्त्रावर आधारलेली आहे. भरतमुनींचा "रस-सिद्धान्त" ,आज ठिकठिकाणी आपल्याला अनेक साहित्यप्रकारांमधून अनुभवास मिळतो. रस सिद्धान्ताचा प्रभाव आजच्या मनोविकारी घटना तसेच आधुनिक काळात प्रचलित होत चाललेल्या सौंदर्यशास्त्रावर देखील पडताना दिसत आहे.

**२)अर्थशास्त्र : -** भारताची राजनैतिक परंपरा समजावून घ्यायची असेल तर कौटिल्याचे अर्थशास्त्र अभ्यासलेच पाहिजे कारण त्यामध्ये राज्यकारभार कसा करावा राजकीय डावपेच कसे साधावेत यांचे सखोल विवेचन केलेले आहे आणि अर्थशास्त्रात अर्थ आणि धर्म यांचे समतोल राखण्याचे नियम देखील सांगितलेले आहेत "राजा हा प्रजेचा सेवक आहे" ही अमूल्य अशी संकल्पना कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये भारतीय ज्ञानपरंपरेला पूरक असे आदर्श शासनाचे एक उदाहरणच दिलेले आहे आणि आजचा राज्यकारभार देखील याच तत्वांना अनुसरुन होताना दिसतो.

**3)आयुर्वेद :-** भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरदेखील आयुर्वेद स्वीकारले जाताना दिसत आहे. आयुर्वेदातील प्रसिद्ध श्लोक:

**"धर्मार्थकाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम् ।**
**रोगास्तस्यापहर्तार: श्रेयतो जीवितस्य च।।**

(चरकसंहिता सूत्रस्थान 1.15)

वरील श्लोकाचा भावार्थच सांगून जातो की.जे चार पुरुषार्थ आहेत, धर्म अर्थ काम आणि मोक्ष यांना प्राप्त करून घेण्याचे एकमात्र साधन आहे स्वस्थ (निरोगी) शरीर. कारण रोगी मनुष्य यामधील एकही पुरुषार्थ साध्य करु शकत नाही.

आयुर्वेदालाच अथर्ववेदाचे उपांग मानण्यात आलेले आहे . आयुर्वेदाचे जे मुख्य ग्रंथ आहेत चरक संहिता, सुश्रुत संहिता,अष्टांगहदय या ग्रंथावरच आजचे संपूर्ण वैद्यकशास्त्र आधारलेले आहे "पंचमहाभूत सिद्धान्त" पृथ्वी, जल , अग्नी, वायु आणि आकाश या पाच निसर्गातील महाभूतांवर आपली शरीररचना आणि आरोग्य विसावलेले आहे आणि या पंचमहाभूत सिद्धान्ताचा भारतीय ज्ञान परंपरेशी घनिष्ठ संबंध आहे.

**४) ज्योतिष :-** भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणून ज्योतिष शास्त्राकडे पाहिले जाते कारण ज्योतिष शास्त्रामध्ये ग्रह,तारे,नक्षत्र ,योग इत्यादी निश्चित केले जातात आणि ज्योतिषांचा आधारस्तंम्भ पंचांग हे यावर आधारित असते ज्योतिष शास्त्र हे पूर्णपणे कर्म सिद्धांताशी जोडलेले आहे, आणि आपल्या या भूतकाळातील कर्माचा परिणाम ग्रहस्थितीत दिसतो निसर्गातील ऊर्जास्त्रोत जे सूर्य, चंद्र, तारे आहेत. त्यांचा परिणाम मानवी जीवनावर होतो आणि आणि त्यामुळेच प्रत्येक मनुष्याची जन्मकुंडली तयार केली जाते .

जगाने जरी आधुनिकतेकडे वाटचाल केलेली असली तरी ज्योतिषशास्त्राशिवाय काही मनुष्य आपल्या कर्माला सुरुवातदेखील करित नाहीत असा प्रत्यय येताना दिसतो आणि म्हणून ज्योतिषशास्त्र हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटकच झालेला दिसून येतो आणि यावरुनच सिद्ध होते की, ज्योतिष हे संस्कृतमधील ज्ञानाचे एक अंग आहे आणि ज्योतिष शास्त्र हे भारतीय ज्ञानपरंपरेची समृद्ध परंपरा जपताना दिसत आहे-

**" भारतस्य प्रतिष्ठे द्वे संस्कृत संस्कृती तथा"**

वरील वचनाचा अर्थ हा सुयोग्यरित्या आजच्या संस्कृतीला आणि संस्कृत भाषेला पूरक आहे सर विल्यम जोन्स यांनी संस्कृत भाषेला सर्व भाषांची जननी म्हणूनच संबोधित केलेले आहे. भारतीय ज्ञानपरंपरेच्या प्रवाहामुळे संस्कृत कुठे नाही असे नाही. आपल्या या भारतीय ज्ञानपरंपरेमध्ये समाविष्ट संस्कृतीमुळे संस्कृत भाषा ही जगभरातील कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली दिसून येते याची बरीचशी उदाहरणे आपल्याला पाहता येतील,जसे की योगाला भारतीय ज्ञान परंपरेचा अव्दितीय खजिनाच मानण्यात आलेला आहे.आणि योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे. आणि जगभरात योगाचे महत्व वाढतच आहे. कोविड-१९ च्या महामारीच्या काळात, जेव्हा एकमेकांना व्यक्तिशः भेटून हस्तांदोलन करणे कठीण झालेले होते तेव्हा अनेक नेते देखील आपली भारतीय संस्कृतीनुसार हात जोडून "नमस्ते" करताना दिसले भारताच्या ज्ञानपरंपरेमध्ये संस्कृतातील वेद,पुराणे उपनिषदे,धर्मग्रंथ यांच्या आधारावरच आपले ज्ञान आणि सांस्कृतिक ठसा उमटविताना दिसत आहेत. आणि आपल्या भारतीय ज्ञान परंपरेचे हे एक प्रतिबिंबच

आहे. हवामानातील बदलांपासून ते कोणत्याही इतर संकटापर्यंत भारतीय ज्ञान परंपरेतील ज्ञानाचा वेळोवेळी उपयोग होताना दिसत आहे.

आधुनिकीकरणाच्या या स्पर्धेमध्ये भारतीय ज्ञान परंपरेने जगाला हे दाखवून दिलेले आहे की, संसारातील ऐहिक सुख,संपत्ती,आलिशान जीवन हीच अंतिम ध्येये नाहीत तर लोक पुन्हा शांतीच्या मार्गाकडे वळताना दिसत आहेत.आणि याच शांतीच्या मार्गाकडे येत असताना ते पुन्हा भारतीय ज्ञानपरंपरेचा जो खजिना आहे म्हणजेच वेद,पुराणे,उपनिषदे या साहित्याकडे येताना दिसत आहेत. आतापर्यंत आपण संस्कृत भाषेच्या आधारावर भारतीय जानपरंपरा कशी टिकून आहे ते पाहिले आणि संस्कृत भाषेने आपल्या भक्कम पायावर भारतीय ज्ञानपरंपरेची अगाध परंपरा टिकवून ठेवलेली दिसून येते.

**भारतीय ज्ञान परंपरा आणि संस्कृत यांमधील उपयुक्तता** :- अलीकडील काळात आधुनिक शिक्षणपद्धतीमध्ये भारतीय ज्ञान परंपरेच्याच प्रासंगिकतेवर भर दिलेला दिसत आहे.योगाव्दारे मनाला शांती आणि स्वास्थ्य (निरोगीपणा) वेदांतील पर्यावरणजागरुकतेवर आधारित शाश्वत विकास अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राद्वारे नीतीमत्ता,राजकारण आणि नैतिक शासन आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आंतरविद्याशाखीय शिक्षण परंपरा नाट्यशास्त्राव्दारे संस्कृत ग्रंथांमध्ये असणारे भारतीय सौंदर्यशास्त्राचे अन्वेषण .

**उपसंहार:-** संस्कृत भाषेला ज्याप्रमाणे भारतीय ज्ञानपरंपरेमध्ये सर्वोच्च स्थान प्राप्त झालेले आहे. त्यामुळे संस्कृत भाषा आता एका काळाचीच भाषा राहिली नाही,तर भारताच्या सांस्कृतिक संपन्नतेची खरी ओळख करुन देणारी भाषा ठरलेली दिसून येते. संस्कृतने समाजाला तत्वज्ञान, कला,साहित्य इत्यादींचा संगम दिला. वैदिक काळ असो किंवा आजचे डिजिटल युग असो संस्कृत भाषेने सर्व काळांमध्ये स्वत:ला जुळवून घेतले आणि आपण पाहिलेच की मानवाच्या कर्तव्यबुद्धीशी जोडली जाणारी वेदांतील "ऋत" ही संकल्पना आजही प्रचलित होत आहे आणि आज भारतीय ज्ञान परंपरेच्या विकासामुळे संस्कृत ही केवळ विशिष्ट वर्गाची भाषा न राहता ती सर्वमय झालेली आहे आणि यातच या भाषेचा विजय होताना दिसत आहे.आपणास या शोध लेखातून एक महत्वाचा संदेश मिळतो तो म्हणजे वेदांतील जी महत्वाची स्तोत्रे आहेत त्या स्तोत्रांनी सुरुवात होऊन ते विज्ञानवादी ग्रंथांपर्यंत,महाकाव्यांपासून ते सौंदर्यशास्त्रीय सिद्धांतांपर्यंत संस्कृत भाषेने हा परंपरागत चालत आलेला वारसा जपण्याचे, प्रसारित करण्यासाठी एक माध्यम म्हणून काम केले. संस्कृत भाषेच्या ज्ञानाचे पुनरुज्जीवन आणि अभ्यासक्रमात संस्कृत भाषेचा समावेश केल्याने शाश्वत,नैतिक व मानवकेंद्रीत विचाराला प्रेरणा मिळू शकते अशाप्रकारे संस्कृत भाषा भारतीय ज्ञान परंपरेला आणि संपूर्ण मानवतेलाच एका जीवंत मार्गदर्शकाचे कामच करित राहील यात शंकाच नाही.

## संदर्भग्रंथ :-

**१)** प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा
डॉ अश्विनकुमार राठोड
श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
प्रथमावृत्ती ऑगस्ट 2023
**2)** प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान
द्वितीय आवृत्ती 2005 समर्थ मुद्रणालय
**३)** शिक्षण तत्व आणि व्यवहार, विनोबा परंधाम प्रकाशन, पवणार
**4)** भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास - दासगुप्ता एस् .एन्
**5)** प्राचीन भारतातील शिक्षण- अ .स.अळतेकर.